शासकीय आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षकांच्या पदी नियुक्ती करण्यासाठी उमेदवारांची निवड करण्याकरीता समितीची स्थापना करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक-समिती-१२९३/प्र. क्र. ३५९ [९३]/का. १९
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक ७ एप्रिल, १९९४.

वाचा :- [१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं-२५९३/प्र. क्र. ६४/९३/१४-अ, दि. ११ मे, १९९३.

[२] सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. प्रानिमं-२५९३/प्र. क्र. ६४/९३/१३-अ, दि. १७ मे, १९९३.

शासन निर्णय :- प्रस्तावनेत अनुक्रमांक १ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये शासनाने राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या पदावर भरती करण्यासाठी उमेदवार निवडण्याचे काम निवड मंडळाच्या कक्षेतून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अनुक्रमांक २ येथे नमूद केलेल्या पत्रातील सूचनांनुसार प्राथमिक शिक्षकांच्या पदावर नियुक्ती करण्यासाठी उमेदवारांची निवड करण्याकरीता जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती स्थापन करण्यात आली आहे.

२. शासकीय आश्रमशाळांतून काम करणारा प्राथमिक शिक्षकांचा संवर्ग जिल्हा संवर्ग नसून अपर आयुक्तांच्या प्रादेशिक विभागानुसार प्रादेशिक संवर्ग असल्यामुळे जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांतील प्राथमिक शिक्षकांची पदे भरण्यासाठी उमेदवारांची निवड करणाऱ्या निवड समितीकडे शासकीय आश्रमशाळांतील प्राथमिक शिक्षकांच्या पदांसाठी उमेदवार निवडीचे काम सोपवण्यामध्ये काही प्रशासकीय अडचणी येत असल्यामुळे आदिवासी विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या शासकीय आश्रमशाळांतील प्राथमिक शिक्षकांची पदे भरण्यासाठी वेगळी निवड समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. या बाबीचा आता साकल्याने विचार करून शासन पुढे दिल्याप्रमाणे आदेश देत आहे :-

[१] शासकीय आश्रमशाळांतील प्राथमिक शिक्षकांच्या पदावर नियुक्त्या करण्यासाठी उमेदवारांची निवड करण्यासाठी अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, नागपूर, ठाणे व अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या नियंत्रणाखालील प्रादेशि

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
15 APR 1994

[ कृ. मा. प.. २]

विभागापुरत्या स्वतंत्र निवड समित्या स्थापन करण्यात येत असून या समित्यांची रचना पुढे दिल्याप्रमाणे असेल :-

[अ] संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास. – अध्यक्ष

[आ] संबंधित प्रादेशिक शिक्षण उप संचालक. – सदस्य

[इ] संबंधित विभागीय समाजकल्याण अधिकारी. – सदस्य

[ई] अपर आयुक्तांच्या कार्यालयातील उप आयुक्त. – सदस्य सचिव.

[२] अपर आयुक्तांच्या प्रादेशिक विभागात दोन किंवा त्यापेक्षा जास्त प्रादेशिक शिक्षण उप संचालक आणि विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यरत असल्यास अशा प्रादेशिक विभागात कामकाजाच्या सोयीसाठी अपर आयुक्तांच्या मुख्यालयी मुख्यालय असणारे प्रादेशिक शिक्षण उप संचालक आणि विभागीय समाजकल्याण अधिकारी या समितीचे सदस्य राहतील.

[३] निवड समितीचा अध्यक्ष या नात्याने अपर आयुक्तांनी त्यांच्या प्रादेशिक विभागातील शासकीय आश्रमशाळांतील रिक्त असलेल्या तसेच नजिकच्या भविष्य काळात उपलब्ध होण्याची शक्यता असलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या रिक्त पदांसंबंधी आढावा घेऊन सेवाप्रवेश नियमानुसार प्रशिक्षित उमेदवारांची यादी सर्व संबंधित जिल्हयांच्या सेवायोजन कार्यालये, जिल्हा समाजकल्याण अधिकारी आणि प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडून प्राप्त करून घ्यावी.

[४] उपलब्ध व संभाव्य रिक्त पदांच्या एकूण संख्येच्या साधारणपणे आठपट उमेदवारांची नावे मागविण्यात यावीत व ती अपर आयुक्तांच्या प्रादेशिक विभागातील सर्व जिल्हयातील वरील तीन प्रकारच्या कार्यालयाकडून समप्रमाणात मागविण्यात यावीत. असे करीत असतांना शासनाच्या स्थायी आदेशानुसार मागासवर्गीयांसाठी
१ १०० अंकी नामावलीनुसार तसेच माजी सैनिक आणि अपंग यांच्यासाठी आरक्षित असलेल्या पदांचे अवधान ठेवून आरक्षित संवर्गातील पदांकरीता याच सूत्राप्रमाणे जिल्हा समाजकल्याण अधिकारी आणि प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडून नावे मागविण्यात यावीत.

[५] उमेदवारांची यादी प्राप्त झाल्यानंतर त्यांच्याकडून त्यांनी शालांत परीक्षेत किंवा यथास्थिती उच्च माध्यमिक परीक्षेत मिळविलेले गुण व डी. एड्. च्या परीक्षेत मिळविलेले गुण यांची माहिती प्राप्त करून घेऊन त्यानुसार एकूण उमेदवारांची क्रमवारी ठरविण्यात यावी. अशी क्रमवारी ठरविताना मागास-वर्गीयांसाठी आरक्षीत उमेदवारांची क्रमवारी आरक्षणाच्या प्रकारानुसार वेगवेगळी ठरविण्यात यावी.

[६] मुलाखतीसाठी सर्व उमेदवारांना बोलाविण्यात यावे व त्यांची २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात यावी. त्याचे विभाजन पुढे दिल्याप्रमाणे राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| [क] | अध्यापन पध्दती | – | १० गुण |
| [ख] | विषयाचे ज्ञान | – | ५ गुण |
| [ग] | प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आदिवासींसाठी त्या संदर्भात करावयाचे खास प्रयत्न. | – | ५ गुण |
| [घ] | सार्वत्रिक साक्षरता कार्यक्रम, लोकसंख्या शिक्षण, आदिवासींमधील अंधश्रध्दा निर्मूलन, स्त्री-शिक्षण, पर्यावरण शिक्षण. | – | ५ गुण |

[७] निवड समितीतील सदस्यांनी प्रत्येक उमेदवाराला वरीलप्रमाणे गुण देऊन सर्व सदस्यांच्या गुणांची एकत्रित सरासरी टक्केवारी काढण्यात यावी.

[८] तोंडी परीक्षेतील गुणांची टक्केवारी आणि उमेदवाराने शालांत परीक्षा किंवा यथास्थिती उच्च माध्यमिक परीक्षा आणि डी. एड्. मध्ये मिळविलेल्या गुणांची टक्केवारी यांची एकत्रित बेरीज करून अंतिम क्रमवारी लावण्यात यावी व त्यानुसार उमेदवारांची निवड करण्यात यावी.

[९] २० टक्के उमेदवार जादा निवडण्यात येऊन ते प्रतीक्षा यादीवर ठेवण्यात यावेत. अशी प्रतीक्षा यादी पुढील निवडीपर्यन्त वैध राहील.

[१०] उमेदवारांनी शालांत परीक्षा किंवा यथास्थिती उच्च माध्यमिक परीक्षा आणि डी. एड्. मध्ये प्राप्त केलेले गुण हा निकष निवडीसाठी ठरविण्यात आलेला असल्यामुळे वर क्रमांक ६ येथे नमूद केलेल्या तोंडी परीक्षेव्यतिरिक्त अन्य कोणतीही लेखी परीक्षा घेण्याची आवश्यकता नाही.

४. या शासन निर्णयानुसार कार्यवाहीस प्रारंभ करण्यापूर्वी निवड मंडळाकडून किंवा जिल्हास्तरीय निवड समित्यांकडून काही उमेदवार मागविण्यात आले असल्यास व त्यांच्या निवडी-विषयी कार्यवाही मंडळ किंवा समित्यांनी करून यादी पाठविली असल्यास अशा उमेदवारांना प्रथम नेमणुका देणे गरजेचे राहील. मात्र अशाप्रकारचे मागणीपत्रे दिलेली नसल्यास किंवा दिले असल्यास त्यानुसार मंडळ/समित्यांनी कार्यवाहीस प्रारंभ केला नसल्यास अथवा निवडलेल्या उमेदवारांची यादी पाठविलेली नसल्यास या शासन निर्णयानुसार उमेदवार निवडीची कार्यवाही करण्यात यावी.

५. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी वेळोवेळी अपर आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील निवड समित्यांच्या कामाचा आढावा घेऊन त्यांना आवश्यक मार्गदर्शक सूचना द्याव्यात. तसेच उपलब्ध रिक्त पदे ताबडतोब भरली जाण्याच्या दृष्टिने प्रादेशिक निवड समित्यांनी वेळच्यावेळी आवश्यक कार्यवाही करावी. याविषयी संनियंत्रण करावे.

६. हा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ अ. द. कुलकर्णी ]
सह सचिव.

प्रति,